महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका//न.क्र.०५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email: cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - २४०७७४४१

# सुधारपत्र क्र. ५४ दि. ०५/१२/२०२३
## (म.रा.वि.वि.कं.मर्या., कर्मचारी सेवाविनियम - २००५)

**विषय:** विकलांग अपत्य असलेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना 'विशेष बाल संगोपन रजा' मंजूर करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५७/सेवा-६ दि.२१.०९.२०१६ च्या धर्तीवर विकलांग अपत्य असलेल्या महावितरण कंपनीमध्ये कर्मचाऱ्यांना 'विशेष बाल संगोपन रजा' अनुज्ञेय करण्यात आली आहे. या अनुषंगाने म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम -२००५ मधील सेवाविनियम क्र.५३ (छ) सेवाविनियमाचे सुधारपत्र क्र.३७ दि. १८.०२.२०१७ अन्वये समाविष्ट करण्यात आलेला आहे. तसेच या रजेच्या अनुज्ञेयतेबाबत अटी व शर्ती सेवाविनियम क्र.५३ (छ) अन्वये विहित करण्यात आलेल्या आहेत.

२. आता, केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५७/ सेवा-६ दि.०९.०३.२०२३ अन्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २ (ZC) अंतर्गत, परिशिष्टात नमूद केल्यानुसार दिव्यांगत्वामध्ये काही प्रवर्गाचा समावेश करण्यात आला आहे व विकलांग अपत्याच्या वयोमर्यादेची अट वगळण्यात आलेली आहे.

३. या अनुषंगाने प्रशासकीय परिपत्रक क्र.०१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प), संचालक (वाणिज्य) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचारविनियम करुन शासन निर्णय दि.०९.०३.२०२३ च्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम - २००५ मधील सेवाविनियम क्र.५३(छ) सुधारीत करण्याकरीता मंजूरी प्रदान करण्यात आलेली असून सदर सेवाविनियम खालीलप्रमाणे राहील.

**सेवाविनियम क्र.५३(छ): विशेष बाल संगोपन रजा**

विकलांग अपत्य असलेल्या कंपनीच्या स्थायी किंवा अस्थायी पदांवर कार्यरत महिला व पत्नी नसलेले पुरुष कर्मचारी हे 'विशेष बाल संगोपन रजा' मिळण्यास पात्र असतील. या प्रयोजनार्थ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २ (ZC) नुसार दिव्यांगता खालील नमूद केल्यानुसार असावी.

(१) Loco Motor Disability (अस्थिव्यंग)
(२) Leprosy Cured Person (कुष्ठरोग निवारित/मुक्त)
(३) Cerebral Palsy (मेंदूचा पक्षाघात)
(४) Dwarfism (शारिरीक वाढ खुंटणे)
(५) Muscular Dystophy (स्नायुंची विकृती)
(६) Acid Attack Victims (आम्ल हल्ला पिडीत)
(७) Blindness (पूर्णत: अंध)
(८) Low Vision (अंशत: अंध)
(९) Hearing Impaired (Deaf and hard of Hearing) (कर्णबधिर/ऐकू कमी येणे)
(१०) Speech and Language Disability (वाचा/भाषा दोष)
(११) Intellectual Disability (बौध्दीक अक्षम)

(१२) Specific Learning Disability (विशिष्ट अध्ययन अक्षम)
(१३) Autism Spectrum Disorder (स्वमग्न)
(१४) Mental Behavious/ Mental illness (मानसिक वर्तन/मानसिक आजार)
(१५) Multiple Sclerosis (हातापायांतील स्नायू कमजोर/शिथिल होणे)
(१६) Parkinsons disease (कंपवात)
(१७) Haemopohilla (अधिक रक्तस्त्राव)
(१८) Thalassemia (रक्ताची कमतरता)
(१९) Sickle Cell Disease (रक्तात हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी होणे)
(२०) Chronic Neurological Condition (मज्जासंस्थेचे तीव्र आजार)
(२१) Multiple Disabilities (बहुविकलांग)

**टिप :**

अशा प्रकारची विशेष बाल संगोपन रजा महावितरण कंपनीतील कार्यरत कर्मचाऱ्यांना खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अनुज्ञेय होईल.

१) उपरोक्त सेवाविनियम क्र.५३(छ)(१) मधील विकलांगतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सक (Civil Surgeon) अथवा त्यापेक्षा वरिष्ठ शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याने अथवा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्णयानुसार निर्गमित केलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
२) सदर रजा हक्क म्हणून मागता येणार नाही. सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेनेच सदर रजा घेता येईल.
३) सदर रजा पहिल्या २ हयात अपत्याकरिता लागू राहील. विकलांग अपत्यासाठी वयोमर्यादा राहणार नाही.
४) विशेष बाल संगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन देण्यात येईल.
५) सदर रजा एकाहून अधिक हप्त्यामध्ये (Spell) तथापि एका आर्थिक वर्षात तीनापेक्षा जास्त हप्त्यामध्ये नाही अशा मर्यादेत घेता येईल.
६) विशेष बाल संगोपन रजेचा हिशोब योग्यरित्या सेवापुस्तकात नोंदविण्यात यावा.
७) परिविक्षाधीन कालावधीत विशेष बाल संगोपन रजा मान्य करता येणार नाही. तथापि, कर्मचाऱ्यास विकलांग अपत्याबाबतच्या गंभीर परिस्थितीमुळे रजा घेणे अत्यावश्यक आहे अशी रजा मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास, परिविक्षाधीन कालावधीत अपवादात्मक परिस्थितीत कमीत कमी कालावधीची विशेष बालसंगोपन रजा घेता येईल. त्या प्रमाणात संबंधित महिला/पुरुष शासकीय कर्मचाऱ्याचा परिविक्षाधीन कालावधी वाढविला जाईल.
८) विशेष बाल संगोपन रजेस पात्र असणारा महिला/पुरूष शासकीय कर्मचारी एकापेक्षा जास्त वेळा नवीन नियुक्ती स्विकारत असेल अशा बाबतीत वेगवेगळया ठिकाणच्या कालावधीची रजा एकत्रित गणली जाऊन, अशा एकूण सेवेच्या कालावधीमध्ये एकूण ७३० दिवस इतकीच रजा अनुज्ञेय होईल.
९) अर्ज केल्यास विशेष बाल संगोपन रजेला जोडून अन्य अनुज्ञेय रजा जोडून घेता येईल मात्र अन्य अनुज्ञेय रजा कालावधी एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही.
१०) विकलांग अपत्य शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून आहे, असे प्रमाणपत्र शासकीय कर्मचाऱ्याने सादर करणे अनिवार्य राहील.
११) सदरची रजा कंत्राटी पद्धतीवर कार्यरत कर्मचाऱ्यांना लागू राहणार नाही.
१२) 'विशेष बाल संगोपन रजा' एका वेळेस पाच दिवसांपेक्षा कमी कालावधीसाठी घेता येणार नाही,

४.	अर्जित रजा मंजूर करण्याकरिता म.रा.वि.वि.कं.मर्या.सेवाविनियम २००५ शी संलग्नित नववी अनुसूचीमध्ये विहित करण्यात आलेले सक्षम अधिकारी हे 'विशेष बाल संगोपन रजा' मंजूर करण्यास सक्षम अधिकारी राहतील.

५.	दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २ (ZC) नुसार दिव्यांगत्वामध्ये उपरोक्तपणे समावेश केलेले प्रवर्ग व सुधारीत अटी व शर्ती या सदरचे सुधारपत्र निर्गमित केलेल्या तारखेपासून लागू राहतील.

६.	म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम -२००५ चे सुधारपत्र क्र.३७ दि. १८.०२.२०१७ अधिक्रमित करण्यात येत आहे.

७.	सदर सुधारपत्र महावितरण कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/(वित्त)/(महसूल व देयके),म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी अधिकारी/मुख्य तपास अधिकारी/कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता (देयके व महसुल), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
५) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.